दिनांक २५/१२/२०२१

## प्रेस नोट

आरोपी लोकसेवक राजपाल श्रीपतराव सोनकांबळे वय ४७ वर्षे, पद ग्रामसेवक, वर्ग ३, नेमणुक ग्रामपंचायत वाढवणा खुर्द ता. उदगीर जि. लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.

यातील तक्रारदार यांचे भाउ नागन साधू केदासे यांचा वाढवणा खुर्द येथे सर्वे नं. १२१ मध्ये प्लॉट असून सदर जागेच्या नमुना नं. ८ अ वर जागेची साईज ४४ बाय ६३ एवढी लागली असल्याने त्यात दुरुस्ती करुन देण्याचे कामासाठी म्हणुन २,०००/–रुपये लाचेची मागणी केली बाबतची तक्रार दिनांक २४/१२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातुर यांच्या कडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक २५/१२/२०२१ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांचा सख्खा चुलत भाउ नामे नागन साधू केदासे यांच्या नावे वाढवणा खुर्द येथे सर्वे नं. १२१ मध्ये प्लॉट असून सदर जागेच्या नमुना नं. ८ अ वर जागेची साईज ४४ बाय ६३ एवढी लागली असल्याने त्यात दुरुस्ती करुन देण्याचे कामासाठी म्हणुन पंचासमक्ष तक्रारदार यांना ग्रामसेवक राजपाल सोनकांबळे यांनी २,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

तक्रारदार हे सदर लाचेची रक्कम २,०००/–रुपये देण्याकरीता आरोपी लोकसेवक राजपाल सोनकांबळे यांच्या राहते घरी कांबळे गल्ली, येथे गेले असता आरोपी लोकसेवक राजपाल सोनकांबळे यांनी २०००/– रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष दिनांक २५/१२/२०२१ रोजी स्वत: स्विकारली.

म्हणून तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन वाढवणा, ता. उदगीर, जि. लातुर येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हाचा तपास पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राहुल खाडे, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद, अतिरीक्त कार्यभार पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक पंडीत रेजितवाड, सपोउपनि संजय पस्तापुरे, पोह/रमाकांत चाटे, फारूख दामटे, भागवत कटारे, पोना/संतोष गिरी, मपोना/शिवकांता शेळके, पोका/ शिवशंकर कच्छवे, अमर वाघमारे, संदीप जाधव, दिपक कलवले, मंगेश कोंडारे, गजानन जाधव, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधिक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९९२३४१७०७६ |
| २) | पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधिक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– | १०६४ |
| ४) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner